<u>निशाणी क्र. ९३ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांनी नि.क्र. ६७, ७८ व ८२ वरील पारीत केलेल्या आदेशांची पुर्तता करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

२. वादी यांचे अर्जातील कथन असे आहे की, दि. ०६/०९/२०२२ रोजी नि.क्र. ६७, ७८ व ८२ वरील अर्ज न्यायालयाने मंजुर केले व प्रतिवादी क्र. १, २, ५ व ४ तसेच वादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेण्याचा आदेश पारीत केला. वादीचे वकील पनवेल न्यायालयात व्यस्त असल्यामुळे विहित मुदतीत ते आदेशाची पुर्तता करु शकले नाहीत तरी वादी यांना त्या आदेशाची पुर्तता करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

३. प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर त्यामुळे पुरेशी संधी दिल्यानंतरही त्यांनी आपले म्हणणे दाखल केले नाही त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात आला.

४. वादीचे अर्जातील कथन व नि.क्र. ६७, ७८ व ८२ वरील आदेशाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, नि.क्र. ६७ वरील अर्जाप्रमाणे वादी यांनी विहित मुदतीत प्रतिवादी क्र. १, २ व ५ चे, नि.क्र. ७८ वरील अर्जाप्रमाणे वादी यांनी विहित मुदतीत प्रतिवादी क्र. ३ चे व नि.क्र. ८२ वरील अर्जाप्रमाणे वादी यांनी विहित मुदतीत प्रतिवादी क्र. ४ चे वारस रेकॉर्डवर घेण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सदरच्या आदेशाप्रमाणे वादीने विहित मुदतीत पुर्तता केली नसल्याचे दिसून येते. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी विरुद्ध ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. वादीचा अर्ज मंजुर न झाल्यास वादीचे मोठे नुकसान होऊ शकते. वादी व प्रतिवादीमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरीता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने नि.क्र. ६७, ७८ व ८२ वरील आदेशात नमुद असलेली पुर्तता १५ दिवसात करावी.

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2023.06.13 17:19:38 -0800

खालापूरः (आर.डी.वाबळे)

दि. १३/०६/२०२३ दिवाणी न्यायाधिश क.स्तर खालापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| (a)Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b)Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C.,Khalapur |
| (c) Date of Judgment/Order | : 13/06/2023 |
| (d) Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 13/06/2023 |
| (e) Judgment/Order uploaded on | : 14/06/2023 |